# लोकमान्य टिळक यांचे स्वातंत्र्यविषयक विचार

**डॉ. वंदना अरूण सातपुते,** राज्यशास्त्र विभाग,

भारती विद्यापिठाचे, डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली, vandanasatpute15@gmail.com

---

**प्रास्ताविक :**

इ. स.१८८० पासून १९ व्या शतकाच्या अखेरपर्यंत लो. टिळकांनी राजकीय जीवनाचा पाया घातला. राजकारण व समाजकारण हे करमणुकीसाठी नसून ते एक जीवनयज्ञाचा भाग मानला. लोकमान्य टिळकांनी स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण या मार्गाचा वापर ब्रिटिश राजवटीविरुद्ध जनमानसात रोष निर्माण केला. स्वातंत्र्यलढा जनसामान्यापर्यंत नेण आणि राष्ट्रवादाची विचारप्रणाली उभी करणे ही दोन उद्दिष्टे त्यांच्या डोळ्यासमोर होती. सामाजिक सुधारणासंबंधी त्यांची भूमिका इतर सुधारकांपेक्षा वेगळया होत्या लोकमान्य टिळकांनी सामाजिक सुधारण्यापेक्षा राजकीय स्वातंत्र्यास जास्त प्राधान्य दिले.

**लोकमान्य टिळक यांचे स्वातंत्र्याविषयक विचार:**

लोकमान्य टिळकांचे स्वातंत्र्य विषयीचे विचार हे आधी सामाजिक सुधारणा की राजकीय सुधारणा, स्वराज्य संकल्पना, स्वराज्य साधनेची चतुसूत्री, राष्ट्रवादीची संकल्पना यावरून स्पष्ट होते.

**आधी सामाजिक की राजकीय सुधारणा:**

लोकमान्य टिळक व आगरकरांचा मतभेद निर्माण झाला तो सामाजिक सुधारणेच्या संदर्भात. सामाजिक व राजकीय या दोन्हीपैकी प्रथम कशाला प्राधान्य द्यावे यावरून त्यांच्यात मतभेद निर्माण झाले होते. टिळकांचा विरोध सामाजिक सुधारणा या ब्रिटिश राज्यकर्ते व त्यांनी केलेल्या कायद्याद्वारे ते प्रस्ताव अमलात आणण्याच्या विरोधात होते. सुधारकांच्या मते, सामाजिक जीवन सुधारल्याखेरीज राजकीय सुधारणा शक्यच होणार नाहीत आणि झाली तर ती आपल्याला पेलणार नाही. टिळकांनी सामाजिक सुधारण्याचा संबंध हा धर्म व परंपरेची जोडला. टिळकांच्या मते, आपण जर इतर बाबींकडे लक्ष दिले तर स्वातंत्र्यप्राप्तीकडे आपले दुर्लक्ष होईल. त्यांना सामाजिक सुधारणांचा तर्कदृष्ट्या विचार करणे पसंत नव्हते. पारतंत्र्याच्या शृंखला तोडल्याशिवाय आपले सामाजिक व धार्मिक परंपराचे रक्षण व संवर्धन होणार नाही. अनेक सामाजिक दोषांचे मूळ लोकांच्या मानसिक विकारात व विकृतीत खोलवर रुसले आहे ते केवळ प्रबोधनाच्या मार्गाने त्याचे निर्मूलन होऊ शकत नाही तर ते सावकाश रीतीने व मनोविकृती शास्त्रज्ञांच्या कौशल्याचा वापर करून हाताळले पाहिजे. लोकमान्य टिळकांच्या मते, सामाजिक व धार्मिक जागृती किंवा विचारक्रांती होणे आवश्यक असले तरी ते आपल्या पूर्वपरंपरेला धरूनच केली तरच ती लोकांना पटतील. लोकांच्यामध्ये स्वराज्याच्या आकांक्षा निर्माण करा, त्यांना स्वराज्योन्मुख करा, त्यांच्यात स्वाभिमान जागृत करा, भारतीय संस्कृतीचे महत्त्व पटवून द्या त्यामुळे जनतेत उत्साह निर्माण होईल आणि एकदा की हा उत्साह निर्माण झाला की सर्व सुधारणा क्रमाक्रमाने घडून येतील अशी टिळकांची धारणा होती. राजकीय सत्ता एकदा आपल्या हातात आली की सत्तेच्या जोरावर समाजामध्ये सहजपणे सुधारणा घडवून आणता येतील. त्यामुळे सर्वप्रथम राजकीय हक्क मिळवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

लोकमान्य टिळकांना राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळविण्याच्या दृष्टीने धार्मिक व सामाजिक क्रांती यावर राष्ट्रातील तरुण वर्गाची शक्ती वाया घालवणे योग्य वाटत नव्हते म्हणून त्यांनी आपल्या संस्कृतीच्या अभिमानाच्या परंपरागत पायावर जहाल राजकारणाचा पाया घातला. लोकांच्यामध्ये जर संस्कृतीचा अभिमान जागृत केला तर लोक स्वराज्यासाठी संघर्ष करण्यास तयार होतील. सामाजिक सुधारणा ही राजकीय स्वातंत्र्याचा मार्ग नाही. कोणत्याही सुधारणेचा मुख्य उद्देश विशिष्ट राष्ट्रीयत्वाचा अभिमान जागृत करणे हा असला पाहिजे. सध्याच्या देशाच्या परिस्थितीत विद्वान लोकांच्या बुद्धीसामर्थ्याचा बराचा भाग राजकीय सुधारणेकडे लागला पाहिजे. हिंदुस्थानातील आपण सर्व लोक एका राष्ट्राचे घटकावयव आहोत. स्वराज्य प्राप्ती करता सर्वांनी सर्व भेद विसरून एका मनाने विचार व प्रयत्न करण्यास शिकले पाहिजे ही जर भावना बळावली तरच एक राष्ट्रीयत्वाची कल्पना दृढ होणार आहे असा टिळकांचा दावा होता म्हणून टिळकांनी सामाजिक सुधारण्यापेक्षा राजकीय सुधारणेवर विशेष भर दिला. स्वाभिमान व स्वराज्यनिष्ठा जागृत करून स्वराज्य संपादनासाठी अखंड प्रयत्न करत राहणे हेच परतंत्र्य देशाचे परमकर्तव्य आहे. सामाजिक सुधारणा नंतर

करता येईल यावर ठळक ठाम होते. त्यांनी सामाजिक भूमिका ही राजकीय गरज लक्षात घेऊन घेतलेली आपणास दिसून येते.

**स्वराज्य साधनेची चतुसूत्री:**

परदेशामध्ये ज्या चळवळी झाल्या त्या चळवळी जर पाहिल्या तर सतत संघर्ष केल्याशिवाय ब्रिटिश पार्लमेंटकडून कोणतेही हक्क मिळणार नाही हे टिळकांच्या लक्षात आल्यामुळे त्यांनी स्वातंत्र्याची चळवळ सतत चालू ठेवणे व तिचा विस्तार अधिकाधिक वाढवणे यावर भर दिला. लोकमान्य टिळकांनी स्वदेशी व बहिष्कार या जोड रूपाने महाराष्ट्रात चळवळ सुरू केली. या चळवळीचे जे स्वरूप होते त्याला 'Tilak School of Political Thought' 'टिळकांची राजकीय विचारपद्धती' किंवा त्यांचा संप्रदाय म्हटले जाते. स्वराज्य साधनेची चार प्रकार आहेत ते म्हणजे स्वदेशी बहिष्कार राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य हे टिळकांची चतुसूत्री कलकत्ता अधिवेशनामध्ये मान्य केली. प्रतिकाराचे प्रमुख साधने म्हणून टिळकांच्या जहाल पक्षाने स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण व बहिष्कार यांचा पुरस्कार केला.

**स्वदेशी:**

भारतीय स्वातंत्र्यचळवळीला दादाभाई नवरोजीनी आर्थिक संदर्भ प्राप्त करून दिला. टिळकांनीही आपल्या अनेक लेखांमधून आर्थिक अवनीतीसंबंधी विचार मांडले. बहुजन समाजाच्या व शेतकरी वर्गाच्या पिळवणुकीला त्यांनी वाचा फोडली. बंगालच्या चळवळीतून स्वदेशी संकल्पना पुढे आली. स्वदेशीचा अर्थ ब्रिटिश मालावर बहिष्कार घालण्यापुरताच मर्यादित होता. लोकमान्य टिळकांनी स्वदेशीच्या भावात्मक बाजूवर भर दिला. देशी मालावर अवाजवी कर लादणाऱ्या अन्यायी सरकारी धोरणाविरुद्ध करावयाचे प्रतिकाराचे शस्त्र म्हणून त्यांनी स्वदेशाची संकल्पना मांडली. टिळकांच्या मते, स्वदेशी व बहिष्कार ही दोन्ही राजकीय शस्त्र आहेत आणि त्याचा स्वराज्याशी अविभाज्य संबंध आहे. स्वदेशीचे अंतिम स्वरूप स्वराज्य आहे. आर्यभूमीला माता म्हणून ओळखले हीच स्वदेशी चळवळ आहे. लोकांजवळ ब्रिटिशाकडे असणारी मोठे शस्त्र नाहीत पण भारतीय जनतेकडे सर्वात मोठे शस्त्र आहे ते म्हणजे स्वदेशी. पंढरपूर येथे स्वदेशी संमेलन व प्रदर्शनामध्ये लोकमान्य टिळकांनी स्वदेशी या शब्दाचा अर्थ स्पष्ट केला. स्वदेशी आणि स्वराज्य वेगळे नाही तर स्वदेशीचे अंतिम स्वरूप स्वराज्य आहे. अन्यायविरोध आवाज उठवला पाहिजे. अन्यायाला शब्दाने व कृतीने वाचा फोडली पाहिजे. लोकांनी आपल्या सामर्थ्यांशी अन्यायाचा प्रतिकार केला पाहिजे. टिळक म्हणतात की, अन्यायाला प्रतिकार करण्यासाठी आपल्याजवळ शस्त्र नाही पण आपल्याकडे 'स्वदेशी व्रताचे स्वतःचे अवलंबन' हे एक शस्त्र आहे आणि या शास्त्राचा वापर करून अन्यायाला प्रतिकार केला पाहिजे. टिळकांनी स्वदेशी चळवळचे महत्व व उपयुक्त विविध दिशांनी असल्याचे सांगितले. स्वदेशीची चळवळ ही उदरनिर्वाह करण्याचे साधन मानले. स्वदेशी हा एक स्वावलंबनाचा मार्ग आहे. स्वदेशी माल लोकांनी वापरला तर आपल्या देशातील पैसा आपल्या देशातच राहील त्यामुळे जास्तीत जास्त लोकांनी स्वदेशीचा स्वीकार करण्याचे आवाहन लोकमान्य टिळकांनी केले. सुशिक्षित मध्यमवर्गाने आपल्या देशात आपल्या देशाचे कल्याण करायचे असेल तर देशी कापड वापरण्याचा निश्चय केला पाहिजे व त्यानुसार त्याचा अवलंब करण्याचे आवाहन त्यांनी केले.

**बहिष्कार:**

राजकीय चळवळीचे साधन म्हणून टिळकांनी बहिष्कारचा स्वीकार केला होता. बहिष्कारच्या तंत्राने देशाला राजकीय व आर्थिकदृष्ट्या फायदा होईल अशी टिळकांची खात्री होती. राष्ट्रीय बहिष्कार हा योग्य उपाय आहे पण त्याची योग्यता शब्दात नसून कृतीत आहे. सशस्त्र प्रतिकार करण्याचे सामर्थ्य जनतेच्या अंगी नसले तरी स्वार्थत्याग व आत्मसंयमन याचा उपयोग करून परकीय सरकारला आपल्यावर राज्य करण्यास मदत न करण्याचे सामर्थ्य म्हणजे बहिष्कार होय. टिळकांच्या म्हणण्यानुसार बहिष्कार हे सामान्य शस्त्र नाही त्याचा उपयोग कसा करायचा हे शिकायला पाहिजे. राष्ट्रीय शिक्षणातच स्वदेशी, बहिष्काराचा अंतर्भाव होतो. जे जे परकीय ते बाहेर टाकने असा बहिष्कारचा व्यापक अर्थ सांगितला. बहिष्कार हे एक प्रभावी शस्त्र आहे. बहिष्कार अनेक घटकावर टाकता येतो. हिंदुस्थानात सर्वच परकीय आहे त्या सर्वांवर बहिष्कार घालण्याचे आवाहन टिळकांनी केले. जे जे परकीय त्या त्यावर बहिष्कार घातला तर आपण उद्याच्या उद्या स्वतंत्र होऊ अशी भावना त्यांनी व्याख्यानातून व्यक्त केली.

**राष्ट्रीय शिक्षण:**

राष्ट्रहिताची तत्वे भारतीयांना शिकवण्यात ब्रिटिशांची शिक्षणपद्धती निरुपयोगी आहे कारण सरकारी कॉलेजमधून तरुणांच्या मनात राष्ट्रभावनेचा विकास व राष्ट्रीय चळवळीची बीजारोपण निर्माण होणार नाहीत म्हणून

लोकमान्य टिळकांना राष्ट्रीय शिक्षणाची गरज निर्माण झाली. त्यांनी अनेक ठिकाणी राष्ट्रीय शिक्षणावर व्याख्यान दिले व राष्ट्रीय शिक्षणाचे स्वरूप ही समजावून सांगितले. टिळकांच्या मते, राष्ट्रीय शिक्षण म्हणजे प्रत्येक स्वतंत्र देशातील सरकार आपले प्रजेस जे शिक्षण देते किंवा देऊ इच्छिते ते राष्ट्रीय असते. देशातील तरुण पिढी देशाचे राजकीय, औद्योगिक आणि सामाजिक वैभव राखण्यास आणि वाढवण्यास समर्थ होईल अशा पद्धतीचं शिक्षण देणे हे देशातील विद्याखात्याचे कर्तव्य आहे.

देशातील तरुणांना जातीभेद, जातीद्वेष व जातीमस्तर यामुळे देश कसा विभागला जात आहे, कसा होळपलून निघत आहे याचे ज्ञान राष्ट्रीय शाळेतील मुलांना मिळाले पाहिजे. जातीभेद मोडण्याची किती आवश्यकता आहे हे विद्यार्थ्यांना समजले पाहिजे. जाती -जातीमध्ये तंटे न होऊ देण्याची खबरदारी घेणे हे सर्वांचे आद्यकर्तव्य आहे ही गोष्ट राष्ट्रीय शाळेतील विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवण्यात आली पाहिजे. टिळकांच्या मते, प्रत्येक व्यक्तीला राष्ट्राची जबाबदारी आपल्यावर आहे व सर्व व्यक्तींनी संघटित होऊन ही जबाबदारी पार पाडली पाहिजे ही शिकवण जी देते ते राष्ट्रीय शिक्षण होय. राष्ट्रीय शिक्षण लोकात राष्ट्रीयत्वाची भावना रुजवेल. राष्ट्राकरिता मी वेळ आल्यास मरेन अशी बुद्धी होईल असे शिक्षण राष्ट्रीय शाळेत दिले पाहिजे. देशाकरिता मरावयास तयार होईल तोच खरा देशभक्त. मी राष्ट्राकरिता मरण्यास देखील तयार आहे अशी बुद्धी राष्ट्रातील तरुणात उत्पन्न झाली पाहिजे हे ज्या शिक्षणाने होईल ते राष्ट्रीय शिक्षण आहे. जनतेचे मनपरिवर्तन होवून राष्ट्रीयत्वाची भावना उत्पन्न करणे हे राष्ट्रीय शिक्षणाचं काम आहे. लोकमान्य टिळकांनी चिपळूणकरांच्या मदतीने न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेजची स्थापना राष्ट्रीय शिक्षणाच्या हेतून केलेली दिसून येते. सामान्य लोकांना राष्ट्रीय शिक्षण देण्याच्या हेतूने केसरी व मराठा ही वर्तमानपत्रही सुरू केली तसेच काँग्रेसला आव्हान केले की राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शाळा व कॉलेजची स्थापना देशभर व्हावी आणि यासाठी सर्वतोपरी सहाय्य करावे.लोकमान्य टिळकांचे तत्त्वज्ञान हे स्वातंत्र्याची व राष्ट्रनिर्मितीची होती.

**स्वराज्य:**

ज्या राज्याचा कारभार प्रजेच्या तंत्राने चालतो तेच खरे स्वराज्य. लोकमान्यचा सामान्य माणसावर विश्वास होता. त्यामुळे त्यांनी लोकसत्ताक पद्धतीचा पुरस्कार केला. लोकमान्य टिळकांनी 1914 मध्ये होमरूल चळवळ सुरू केली आणि त्यावेळी त्यांनी स्वराज्याची संकल्पना अधिक स्पष्टपणे मांडली. अकोलेच्या सभेमध्ये लोकमान्य टिळकांनी "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे" हा महामंत्र जनतेला दिला. स्वराज्य म्हणजे संपूर्ण स्वातंत्र्य, लोकमान्य राज्य. ब्रिटिश राजवटीचा हस्तक्षेप नसलेले स्वराज्य मिळण्याची मागणी टिळकांनी केली. टिळकांच्या स्वराज्याच्या संकल्पनेमध्ये सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्त्रिया ही जागरूक नागरिक असू शकतात ही भूमिका त्यानी मांडली. स्त्रियांच्या राजकीय सहभागाला त्यांनी महत्त्व दिले. काँग्रेस लोकशाही पक्षाच्या जाहीरनाम्यामध्ये टिळकांनी स्त्री-पुरुषांना समान मताधिकार असला पाहिजे अशी भूमिका मांडली. हिंदी लोकांना स्वचा अर्थ समजावून दिला. स्व म्हणजे सर्व लोक किंवा प्रजा म्हणजेच अखिल भारत खंड, सर्व राष्ट्र. हा व्यापक अर्थ प्रत्येक भारतीयांच्या मनात बिंबवण्याचा प्रयत्न केला. टिळकांच्या मते, खरे स्वराज्य हे सुराज्य असतेच, सुराज्य हे मात्र स्वराज्य असेलच असे नाही. आपल्या देशाचे प्रशासन आपल्याला देशहितकारक वाटेल त्या पद्धतीने राज्यकारभार करण्याचा लोकांचा अधिकार म्हणजे स्वराज्य अशी टिळकांनी स्वराज्याची व्याख्या केली. स्वराज्य म्हणजे स्वकीय, स्वजातीय व स्वधर्मीय शासकाने केलेले राज्य होय. स्वराज्य म्हणजे संविधानिक शासन असते म्हणजेच शासन हे लोकांच्या आणि त्यांच्या प्रतिनिधीच्या इच्छेनुसार राज्याचा कारभार करते ते स्वराज्य होईल. लोकमान्य टिळकांना हिंदी लोकांचे राज्य हवे होते. स्वराज्याचे रूप ठरवताना, चळवळीचे मार्ग आखताना, संस्था व संघटना स्थापन करताना पाश्चात्यांचा आदर्श ठेवला पाहिजे असे टिळक वारंवार सांगत होते. लोकमान्य टिळकांना स्वराज्य हवे होते ते पाश्चात्यधरतीचे सारखे हवे होते. त्यामुळे राष्ट्रसभा, सार्वजनिक सभा, होमरूल लीग अशा पाश्चात्त्य सारख्या संस्था स्थापन करून व्यक्तीस्वातंत्र्य, समता बंधुता, विचारस्वातंत्र्य इत्यादी पाश्चात्त्य संस्कृतीतील तत्त्वाचा अवलंब करून आणि स्वदेशी, बहिष्कार, करबंदी अशा मार्गाने लोकांना जागृत करुन,त्याग करून, दंड, तुरुंग, मृत्यू या शिक्षा भोगून स्वराज्य मिळवले तरच ते टिकवण्याचे सामर्थ्य लोकांच्या अंगी येईल. यासाठी त्यांनी पाश्चात्यविद्या, पाश्चात्त्य संस्कृती व पाश्चात्य कार्यपद्धती याचा आग्रह धरला. टिळकांनी राष्ट्रजागृतीचा मार्ग सांगून स्वराज्याचा संबंध प्राचीन परंपरेशी जोडला. लोकमान्य टिळकांना परंपरेचा अभिमान जागृत करावयाचा होता तो स्वराज्यासाठी व अधिराज्यासाठी. लोकमान्य टिळकांचा प्रत्येक ग्रंथ, त्यांची प्रत्येक चळवळ, त्यांची प्रत्येक संस्था हे राजकारणासाठीच होती. टिळकांच्या मते, माझा धर्म स्वराज्य मिळवण्याखेरीज

दुसरा असू शकत नाही. लोकांनी स्वातंत्र्यासाठी राज्यक्रांती करायची असते हा विचार भारतामध्ये लोकमान्य टिळकांनी प्रथम मांडला आणि त्या पद्धतीने त्यांनी जागृती घडवून आणण्याचा देखील प्रयत्न केला.

**प्रतियोगी सहकारिता:**

लोकमान्य टिळकांची प्रतियोगी सहकारिता हे धोरण जशास तसे या तत्त्व प्रणालीवर आधारित होते. प्रसंग व प्रतिस्पर्धी यांना खिंडीत गाठले असता नरमाईचे धोरण ठेवायचे आणि प्रसंग अनुकूल असला व प्रतिस्पर्धी अडचणीत आला तर चढायचे धोरण ठेवायचे. छत्रपती शिवाजी महाराज या नीतीने औरंगजेबाशी वागले त्याच नीतीने आपण ब्रिटिशांशी वागले पाहिजे अशा पद्धतीचे टिळकांचे धोरण होते. त्यात टिळकांचा व्यवहारवादी दृष्टिकोन आणि मुत्सद्दीपणा दिसून येतो. आघाताइतकाच प्रत्याघात असा हा अचिंतनसृष्टीतला कर्माचा न बदलणारा कायदा आहे. त्याचेच नाव जशास तसे. हे सचेतन सृष्टीतील रूपांतर आहे असे टिळकांनी म्हटले. स्वातंत्र्यासाठी अनेकांनी अनेक मार्गाचा प्रयत्न करणे टिळकांना अपेक्षित होते. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी टिळकांचा हिंसक मार्गाचा अवलंब करण्यास महात्मा गांधी इतका विरोध नव्हता. त्यांच्या म्हणण्यानुसार सशस्त्र सैनिकांचे मार्ग परिस्थितीसापेक्ष असावेत व परिस्थितीनुरूप बदलावेत. लोकमान्य टिळक हे हिंदी राजकारणाला सनदशीर सुधारणावादातून निशस्त्र क्रांतीवादाकडे नेण्याचा प्रयत्न करीत होते.

**सारांश:**

लोकमान्य टिळकांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्याला तात्विक अधिष्ठान मिळवून दिले. टिळकांनी लोकजागृती करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी साराबंदी, स्वदेशी आणि बहिष्कार या जहाल मार्गाने राष्ट्रीय सभेला नेऊ लागले तेव्हा जहाल व मवाळ हे दोन गट पडले. टिळकांनी सर्वसामर्थ्यांशी जनमत संघटित व संघर्षप्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला. भारतात लोकसत्ता स्थापन करायचे होती म्हणून त्यांना स्वराज्य मिळवायचे होते ते लोकशक्तीच्या बाळावर व त्या शक्तीच्या साह्याने मिळवायचे होते. त्यांनी लोकशक्ती जागृत करण्याबरोबर संघशक्तीचीही उपासनाही तितक्याच निष्ठेने चालवलेली दिसून येते. टिळकांनी राष्ट्रीय आंदोलनाला प्राचीन परंपरा व हिंदुत्व यावर आधारित विचारप्रणाली मिळवून दिली. त्यांनी राष्ट्रीय काँग्रेसला लोकाभिमुख बनवले. टिळकांचे लक्ष स्वराज्यकडे असल्यामुळे येणारे स्वराज्य कसे असावे, त्यात सर्वांना समानतेचे अधिकार असावे की काय याविषयी त्यांनी फारसा विचार केलेला दिसत नाही. स्वराज्य मिळवणे हेच त्यांचे एकमेव उद्दिष्ट होते. टिळकांच्या म्हणण्यानुसार स्वराज्य हे संपूर्ण सामाजिक प्रगतीचे मूळ आहे. स्वराज्यशिवाय कोणतीही गोष्ट घडून येत नाही. टिळकांनी नेमस्त्यांच्या आदर्शांना अधिक व्यवहार्य रूप दिले.

**संदर्भ ग्रंथ:**

१. बिपिन चंद्र - "इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेंडन्स ", के सागर पब्लिकेशन्स, पुणे,२०१०.
२. प्रधान ग. प्र. - "स्वातंत्र्यसंग्रामाचे महाभारत", साधना प्रकाशन, पुणे, २००४.
३. भोळे भास्कर लक्ष्मण - "आधुनिक भारतातील राजकीय विचार",पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स नागपूर २००३.
४. प्रधान ग. प्र. - "लोकमान्य टिळक: व्यक्ती आणि कार्य", केसरी प्रकाशन, पुणे,१९७१.
५. पंडित नलिनी- "महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास", मॉडर्न बुक डेपो, पुणे,१९७२.
६. पळशीकर वसंत - "लोकमान्य बा. गं. टिळक : नेतृत्वाची उभारणी",समाज प्रबोधन पत्रिका.
७. तळवळकर गोविंद- "नवरोजी ते नेहरू", कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
८. डॉ. चौधरी के. के - "आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास" खंड पहिला, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,२०१५.